# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दि १९.०६.२०२६

लोकसेवक बबन नथ्थु पाटील, तत्कालीन प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), धुळे (कृषि खाते वर्ग — ०१) यांनी पदाचा दुरुपयोग करुन बेकायदेशीर गट तंत्रज्ञान व्यवस्थापक व सहायक तंत्रज्ञान अधिकारी पदाची भरती केल्याने गुन्हा दाखल

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | मोहाडी पोलीस स्टेशन, गु.र.नं. २२६/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(क), १३(१)(ड) सह भा.दं.वि. कलम ४१८, ४६५, ४६८, ४७१ व ४७४ प्रमाणे |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(क), १३(१)(ड) सह भा.दं.वि. कलम ४१८, ४६५, ४६८, ४७१ व ४७४ प्रमाणे दि.१९.०६.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | बबन नथ्थु पाटील, सेवानिवृत्त प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), धुळे रा. प्लॉट नं.१५, टेलीफोन कॉलनी, शनि मंदीरासमोर, गोंदूर रोड, देवपूर धुळे |
| थोडक्यात हकिगत :— आरोपी बबन नथ्थु पाटील, तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांचे विरुध्द दि.०५.१२.२०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा),धुळे येथे प्रकल्प संचालक या पदावर कार्यरत असतांना पदाचा गैरवापर करुन बेकायदेशिररित्या गट तंत्रज्ञान व्यवस्थापक 'व सहायक तंत्रज्ञान अधिकारी या पदांची बेकायदेशीर भरती केल्या बाबत प्राप्त तक्रारीनुसार उघड चौकशी केली असता आरोपी बबन नथ्थु पाटील, तत्कालीन प्रकल्प संचालक यांनी त्यांचा पदाचा गैरवापर करुन दि.०५.१२.२०१५ ते जुलै २०१८ या कालावधीत गट तंत्रज्ञान व्यवस्थापक व सहायक तंत्रज्ञान अधिकारी या पदावर नेमणुक देण्याकरीता उमेदवारा कडून आई वडीलांच्या बँक खात्यात दि.२१.११.२०१६ ते दि.०८.१२.२०१६ या कालावधीत एकुणं रक्कम १६,८५,०००/— रू. स्विकारुन शासनाचे करार तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येवु नये, याबाबत आदेश असतांना त्यांनी गैरवापर करून' बनावट नेमणुकपत्रे तयार करून उमेदवारांना गट तंत्रज्ञान व्यवस्थापक (बीटीएम), व सहायक तंत्रज्ञान अधिकारी (एटीएम) पदांवर नियमबाह्य नियुक्ती केल्याचे उघड चौकशी अंती निष्पन्न झाल्याने त्यांच्या विरूध्द प्रशासकिय अधिकारी पदाचा दुरूपयोग करून स्वत:स अनुचित आर्थिक फायदा करून शासनाचे नुकसान केले. यामुळे त्यांनी लोकसेवक म्हणुन आपल्या पदाचा जाणीवपुर्वक गैरवापर करून गुन्हेगारी स्वरूपांचे वर्तन केल्याने त्यांचे विरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |
| चौकशी अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| तपास अधिकारी | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे. |
| चौकशी पथक | पोहेकॉ. राजन कदम,मुकेश अहिरे,संतोष पावरा, पोकॉ, मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, सागर माळी, चंद्रकांत सैदाणे, सुधीर मोरे व जगदिश बडगुजर |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागं, धुळे येथे संपर्क साधावा.

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ईमेल :— dyspacbdhule@gmail.com
संपर्क कमांक :— १०६४ दुरध्वनी कमांक :— ०२५६२—२३४०२०
व्हॉट्सअॅप क. :—७७९८१६१०६४

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.

Scanned with OKEN Scanner